# दिनांक 16/04/2025

1 कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/04/2025 रोजी 10:00 वा च्या सुमारास मौजे भोईरवाडी येथील गुरुकुल कॉलेजमधील मोकळया जागेत ता.कर्जत येथे फिर्यादी रा.भोईरवाडी ता.कर्जत व जखमी साक्षीदार हे मौजे भोईरवाडी येथे आस्था गुरुकुल कॉलेज येथे स्टाईल्सचे काम करतात. फिर्यादी यांचे सोबत काम करणारा साक्षीदार हे दिनांक 13/04/2025 रोजी कंपनीमध्ये कामावर येवुन दुपारपर्यंत काम करुन हाप डे सुट्टीवर जावुन मौजे भोईरवाडी येथे सुट्टी घेवुन मौजे भोईरवाडी येथे जावुन चिकन घेवुन किराणा दुकानामध्ये मसाला घेत असताना त्यांचे मोबाईल मध्ये दुकानाचे फोटो काढत असताना तेथील लोकांनी मारहाण केली होती फिर्यादी व साक्षीदार हे सर्वजण मौजे भोईरवाडी येथे गुरुकुल कॉलेजमध्ये काम करीत असताना यांतील आरोपीत क्र.01 ते 03 व त्यांचे सोबत असलेले अनोळखी इसम असे जावुन फिर्यादी व साक्षीदार यांना म्हणाले की,कल जिस बंदे ने भोईरवाडी गाँव मे जो मॅटर कीया है वो कहा है, तेव्हा फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांचे नाव सांगून तो आता काम सोडुन कोठेतरी निघुन गेला आहे असे सांगितले असता त्या गोष्टीचा व मागील भांडणाचा आरोपीत यांस राग आल्याने तुम्ही त्याला पळवुन लावले आहे काय असे बोलुन संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना लोखंडी पाईपने मारहाण दुखापत करुन तुम्हाला या ठिकाणी काम करु देणार नाही तुम्हाला बघुन घेतो अशी धकमी देवुन शिवीगाळ केली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.101/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2)352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अण्णासाहेब वडते हे करीत आहेत.

2. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/02/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे साळाव रोहा रोडवर शिरगाव गावचे हद्दीत, ता.मुरूड येथे एफ झेड मोटार सायकल क्र एम.एच 06 सी.सी 3069 वरील आरोपी चालक रा.वळके ता.मुरूड यांचे कडे मोटार सायकल चालविण्याचा परवाना नसताना मोटार सायकलच्या मागे फिर्यादि यांचे पती यांना बसुन मोटार सायकल वरून गावात फेरफटका मारण्यासाठी गेले असता साळाव रोहा रोडवर शिरगांवचे हद्दीत आलेवेळी रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मोटार सायकल अतिवेगाने व हयगयीने व बेदरकारपणे चालविल्या मुळे मोटार सायकल स्लीप होवुन फिर्यादि यांचे पती हे मोटार सायकल वरून खाली पडुन त्यामध्ये त्याच्या डोक्याला लहान मोठया व गंभीर स्वरूपाची दुखापत होवुन तसेच छातीस मुकामार लागल्याने त्यांचे मृत्युस कारणीभुत झाले.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.41/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184,3(1)/181, भारतीय न्याय संहीता कलम 2023 चे कलम 106(1),281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/श्री.संजय ठाकूर हे करीत आहेत.

3. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 17:45 वा च्या सुमारास मौजे जिल्हा परीविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलाचे निरीक्षणगृह /बालगृह ,ता.कर्जत येथे अपहरित वय 13 वर्षे,हा बालगृहच्या मैदानात खेळत असताना तो अल्पवयीन आहे हे माहीत असताना त्याचे अज्ञान पणाचा फायदा घेवून त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता त्यास फुस लावून पळवून नेले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.102/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे - 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/वारा हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 15.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 186 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,72,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.